# पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003

दुरध्वनी नंबर 0253-2309700

E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट** दिनांक :- १९/०२/२०२५

## कळवण शहरातील अवैध मटका-जुगार व दारू अड्डयांवर नाशिक ग्रामीण पोलीसांचे छापे

---

नाशिक ग्रामीण जिल्हयातील अवैध व्यवसायांचे समुळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने यांचे आदेशान्वये पोलीस ठाणे निहाय कारवाई करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने नाशिक ग्रामीण पोलीसांचे विशेष पथकाने कळवण शहरात अवैधरित्या सुरु असलेले मटका-जुगाराचे व दारूचे अड्डयांवर छापेमारी करून कारवाई केली आहे.

कळवण पोलीस ठाणे हद्दीत ओतुर रोड परिसरात महालक्ष्मी थिएटर लगत असलेल्या मोकळया ठिकाणी, काही इसम अवैधरित्या मटका-जुगाराचा अड्डा चालवित असल्याची गोपनीय बातमी परिविक्षाधीन भापोसे श्रीमती अपराजीता अग्निहोत्री यांना मिळाली होती. बातमीप्रमाणे आज दि. १९/०२/२०२५ रोजी विशेष पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सदर ठिकाणी छापा टाकुन कारवाई केली आहे. सदर कारवाईत अवैधरित्या मटका-जुगार खेळणारे व खेळविणारे खालील इसमांना ताब्यात घेण्यात आले आहे.

१) भाऊसाहेब पगार, रा. लक्ष्मीनगर, कळवण, २) दिलीप कारभारी पगार, ३) हनुमान सुपडू डावरे, ४) रामलाल त्रंबक शिलावंत, ५) निर्मल उदय जेवराणी, सर्व रा. कळवण, ता.कळवण, ६) मंगेश तानाजी पवार, रा. गांगवण, ता.कळवण, ७) देवबा दगा पवार,रा. चाचेर, ता.कळवण, ८) रामा संभाजी पवार, रा.मानुर, ता. कळवण

सदर छापा कारवाईत यातील मटका चालविणारा आरोपी क्र. १. भाऊसाहेब पगार याचे सांगणेवरून आरोपी क्र. २ ते ८ हे स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी मिलन, श्रीदेवी व कल्याण नावाचा मटका जुगार खेळतांना व खेळवितांना मिळुन आले असून त्यांचे कब्जातुन ३९,२४०/- रूपये रोख रक्कम, ५६,०००/- रू. किं.चे मोबाईल फोन, ७,००,०००/- रू. किं.च्या मोटर सायकल तसेच मटका-जुगाराचे साहित्य साधने असा एकुण ७,९५,२४०/- रू. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यातील ताब्यात घेतलेले आरोपीतांविरूध्द कळवण पोलीस ठाणे येथे गुरनं ४६/२०२५ महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच कळवण शहरातील महालक्ष्मी थिएटर लगत असलेल्या ओतुर रोड परिसरात इसम नामे शैलेंद्र किसन कानडे, रा. कळवण, ता.कळवण हा स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी विनापरवाना बेकायदेशीररित्या देशी मद्याची विक्री करतांना मिळुन आला असून त्याचे कब्जातुन देशी मद्याचा साठा व मोबाईल फोन असा एकुण १३,५९५/- रू. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर इसमाविरूध्द कळवण पोलीस ठाणेस प्रोव्ही.गुरनं ४७/२०२५ महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. आदित्य मिरखेलकर, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. अनिकेत भारती यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे परिविक्षाधीन भापोसे श्रीमती अपराजीता अग्निहोत्री, परि.पोलीस उपअधीक्षक श्रीमती अद्वीता शिंदे, सहा.पोलीस निरीक्षक निलेश बोडखे, पोलीस अंमलदार सुनिल पगारे, राहुल गांगुर्डे, योगेश हेंबाडे, प्रकाश रिकामे, चेतन शेवाळे, चालक नितीन गांगुर्डे यांचे पथकाने सदरची कारवाई केली आहे.